दैनिक

अन्यायाचा प्रतिकार

# रायगड नगरी

महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

• वर्ष १६ वे • अंक १२९ • MAHMAR/2006/17212 • रायगड • सोमवार दि.२ ऑगस्ट २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी

जाहिरातीचे उत्तम माध्यम

या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.

Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'

For Booking....

Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706

Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434

Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# सर्वसामान्यांना त्यांचे हक्काचे घर देण्यासाठी राज्य शासन कटीबद्ध : मुख्यमंत्री

## बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प वरळी येथील पुनर्वसन इमारतींच्या बांधकामांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ




**दै.रायगड नगरी । मुंबई**

स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे,असं म्हणणाऱ्या लोकमान्य टिळकांनी क्रांतीची मशाल पेटवली. पण आज या स्वराज्यामध्ये सर्वसामान्य जनतेला त्यांचे हक्काचे घर देण्याचे आव्हान आम्ही स्वीकारले असून त्यांना हक्काचं घर मिळवून देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे अशी ग्वाही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिली.

मुंबईच्या मध्यवर्ती भागात वसलेल्या वरळी येथील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील पुनर्वसन इमारतींच्या बांधकामाचा शुभारंभ मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते आज वरळी येथील जांबोरी मैदानावर झाला.त्यावेळी ते बोलत होते.

मुख्यमंत्री श्री.ठाकरे म्हणाले, बीडीडी चाळीचा एक मोठा इतिहास आहे. या चाळींनी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ पाहिली, महाराष्ट्रासाठी रस्त्यावर सांडलेले रक्त पाहिले. वासुदेव बळवंत फडके यांच्यासारखे क्रांतिकारक देखील या चाळींमधील राहिले. बटाट्याची चाळ या पुस्तकातून पु. ल. देशपांडे यांनी चाळीच्या जीवनाचे सुंदर वर्णन केलं आहे. अनेक क्रांतिकारी चळवळी आणि मुंबईच्या सामाजिक, राजकीय तसेच सांस्कृतिक जडणघडणीत चाळींचा व त्यातील कष्टकऱ्यांचा मोठा वाटा आहे. त्या लोकांचे फार मोठे योगदान मुंबईच्या विकासात राहिले आहे .आपण कितीही मजली इमारत आणि टॉवर्स या ठिकाणी बांधले तरी या चाळींच्या ऋणातून आपण मुक्त होऊ शकणार नाही.

संयुक्त महाराष्ट्रासाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांपैकी अनेकांचे वास्तव्य या मुंबईच्या चाळींमध्ये होते.या हुतात्म्यांची आपण नेहमी आठवण ठेवली पाहिजे. उद्या चाळीतून तुम्ही टॉवरमध्ये जरी गेलात तरी आपली संस्कृतीची नाळ तुटू देऊ नका, अख्खे आयुष्य आपण याठिकाणी जगला आहात, हे घर तुमचे स्वतः चे आहे, त्यामुळे कोणत्याही मोहात पडू नका आणि मराठी पाळंमुळांना धक्का लावू देऊ नका असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.येथील ज्या जांबोरी मैदानाने क्रांतीच्या ठिणग्यांना जन्माला घातले आहे, त्याच ठिकाणी आज हा रोमहर्षक असा क्षण घडतोय असेही मुख्यमंत्री श्री.ठाकरे म्हणाले.

गेल्या काही महिन्यात सुमारे पाच लाख घरं आपण ग्रामीण भागामध्ये ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून बांधली, गिरणी कामगारांना देखील घर देण्यास सुरुवात केली असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. माझे दोन्ही आजोळ हे चाळीतच होते, मी त्यांच्याकडे लहानपणी जायचो, त्यामुळे चाळीतले जीवन मला माहिती आहे अशी आठवणही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितली.

महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यावेळी म्हणाले, अनेक विकासाचे प्रकल्प राज्यात सुरू आहेत. ऐतिहासिक अशी शेतकरी कर्जमाफी या शासनाने दिली. समृद्धी महामार्गाचे काम गतीने सुरू आहे. तसेच मुंबईतील कोस्टल रोड, स्कायवॉक, मोनोरेल ही कामही वेगाने सुरू आहेत. बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पामुळे त्यात मानाचा तुरा खोवला जाणार आहे. या प्रकल्पातील भाडेकरू रहिवाशांच्या ज्या मागण्या होत्या, त्या मान्य झाल्या असून या पुनर्विकास प्रकल्पातील अडथळे त्यामुळे दूर झाले आहे. मुंबई देशाची आर्थिक राजधानी असून मुंबईच्या विकासात श्रमिकांचा वाटा मोठा आहे. मुंबई हा महाराष्ट्राचा अविभाज्य भाग आहे व मुंबईला महाराष्ट्रापासून कोणीही वेगळे करू शकणार नाही. मुंबईचे महत्त्व कमी होणार नाही.

गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड म्हणाले, अनेक क्रांतिकारक, साहित्यिकांसह रामनाथ पारकर यांच्यासारखे क्रिकेटपटूही या बीडीडी चाळीमध्ये वास्तव्याला होते. बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाचे काम करताना अनेक अडचणी येत होत्या. करारनामा,विस्थापितांचे प्रश्न अशी अशी अनेक आव्हाने होती. परंतु त्यातून मार्ग काढला. पुढील ३६ महिन्यात हे काम पूर्ण करण्यात येईल अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. सुमारे तीन हजार पोलिसांना घरे देण्याचे प्रस्तावित असून येथील निवृत्त पोलीस तसेच २०१० पूर्वीपासून ज्यांचे वास्तव्य आहे अशा पोलिसांनाही घरे देण्याचे नियोजन आहे.कामाठीपुरा व कुलाबा येथील झोपडपट्टीचाही समूह पुनर्विकास करण्यात येणार आहे.

### कष्टाचा ठेवा विकू नका : शरद पवार

ज्येष्ठ नेते,माजी मुख्यमंत्री, खासदार शरद पवार म्हणाले, बीडीडी चाळींना अतिशय गौरवशाली असा इतिहास आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रबोधनकार ठाकरे, साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे, आचार्य अत्रे अशा कितीतरी महान व्यक्ती व क्रांतिकारकांचे वास्तव्य या चाळींमध्ये होते. महाराष्ट्राच्या ऐक्याचे येथे दर्शन घडते.अनेक जाती- धर्माचे लोक वर्षानुवर्षे एकत्रितपणे येथे राहत आहेत.अशा या चाळींचा इतिहास आपण जतन केला पाहिजे. या चाळींमध्ये घरासोबतच लोकांना अन्य सुविधाही दिल्या पाहिजेत. चाळींच्या जागी इमारती उभ्या राहतील पण कष्टकरी माणसाला येथून जाऊ देऊ नका. तुमच्या कष्टाचा ठेवा विकू नका तसेच या भागातील मराठी टक्का कमी करू नका असेही पवार यांनी सांगितले.

## संक्षिप्त...

### राज कुंद्राकडून मुंबई पोलिसांना सापडल्या ५१ पॉर्न फिल्म्स



**दै.रायगड नगरी । मुंबई**

पॉर्न फिल्म बनवण्याच्या आरोपांनी घेरलेल्या बॉलिवूड अभिनेत्री शिल्पा शेट्टीचे पती राज कुंद्रा याच्या प्रकरणाची शनिवारी मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी झाली. या सुनावणीदरम्यान सरकारी वकिलांनी न्यायालयाला अनेक धक्कादायक गोष्टी सांगितल्या आहेत. वकिलाने सांगितले की, मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेला राज कुंद्रा आणि रायन थॉर्प यांच्याकडून खूप मजबूत पुरावे मिळाले आहेत.

सरकारी वकील अरुणा पै यांनी न्यायालयाला सांगितले की, पोलिसांना २ ॲप्समधून ५१ पॉर्न चित्रपट सापडले आहेत. राज कुंद्रा आणि रायन थॉर्प यांनी व्हॉटसअप ग्रुप आणि चॅट्स डिलीट करण्यास सुरुवात केल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. अशाप्रकारे, हे लोक या प्रकरणाशी संबंधित पुरावे नष्ट करत होते, म्हणून त्यांना अटक करणे आवश्यक होते. राज कुंद्रा आणि रायन थॉर्प यांनी त्यांच्या अटकेविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे आणि त्या अटकेला 'बेकायदेशीर' म्हटले आहे.

व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे झालेल्या या सुनावणीत सरकारी वकिलांनी न्यायमूर्ती अजय गडकरी यांच्या खंडपीठाला सांगितले की, आरोपींवर पॉर्न कॉन्टेंट स्ट्रीम करण्याच्या गंभीर आरोपांना सामोरे जावे लागत आहे आणि पोलिसांना त्यांच्या फोन आणि स्टोरेज उपकरणांमधून महत्त्वपूर्ण पुरावे मिळाले आहेत. पुढे त्यांनी सांगितले की, राज कुंद्रा आणि लंडनमध्ये राहणारे त्यांचे मेहुणे (प्रदीप बक्षी) यांच्यातील हॉटशॉट्स ॲपवर ईमेल देखील प्राप्त झाले आहेत. प्रदीप बक्षी या मेहुण्याला हॉटशॉट्स ॲपचे मालक असल्याचे सांगितले जाते.

## देवळी, जुई अब्बास गावांना भुसखलानाचा धोका : ग्रामस्थ भयभित



**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील खारपाले ग्रामपंचायत हद्दीतील देवळी व जुई अब्बास या गावातील ग्रामस्थांना भुसखलनाची भिती वाटु लागली आसुन नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुले गावा जवल असलेल्या डोंगरावरुन माती व दगड खाली येत असल्याने येथील ग्रामस्थामध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असुन या ठिकाणी संरक्षण भित बांधुन मिळावी अशी मागणी येथील ग्रामस्थांची आहे.

या दोन्ही गांवात मिळुन एकुण ३५० कुंटुंब राहतात या गांवाची लोकसंख्या सुमारे १५०० असुन या गावाचे पुर्वेकडे उंच डोंगर पसरला आहे.

या डोंगराच्या पायथ्यांशी देवळी, जुई अब्बास ही गावे असुन पावसाळ्यात डोंगर उतारावरुन माती दगड खाली येतात.तसेच गेल्या आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीत डोंगरावरुन माती दगड वाहुन खाली आल्याने भुसखलनाची भिती नागरिकांना वाटु लागली आहे.

महाड, पोलादपुर येथील भुसखलनाच्या घटना घडल्यानंतर देवळी व जुईअब्बास गावामध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असुन गावाचे पुर्वेला सरक्षण भिंत बांधावी या मागणीचे निवेदन मुख्यमंत्री उध्दव ठाकरे, जिल्हाधिकारी, उपविभागिय अधिकारी, तहसिलदार यांना देण्यात आले आहे.

### शिवसेना भवन फोडु या वक्तव्याचे पनवेलमध्ये पडसाद

## कळंबोलीत शिवसैनिकांनी आ. प्रसाद लाड यांचा पुतळा जाळला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

वेळ आली तरी शिवसेना भवन फोडु असे वक्तव्य भाजप विधान परिषदेचे आमदार प्रसाद लाड यांनी केले होते. या वक्तव्याचा शिवसैनिकांनी खरपूस समाचार घेतला. याचे पडसाद पनवेलमध्ये सुद्धा पडले. कळंबोली मध्ये शिवसैनिकांनी रविवारी लाड यांचा पुतळा जाळुन त्यांच्या प्रतिभेला जोडे मारत घोषणाबाजी केली. महानगरप्रमुख रामदास शेवाळे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन केले.

महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर शिवसेना आणि बीजेपी यांच्यामध्ये सातत्याने वाक्युद्ध सुरू आहे. परस्परांवर कुरघोडी करण्याच्या अनुषंगाने दोन्ही पक्षांकडून संधी सोडली जात नाही. सीएम गेले उडत केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या वक्तव्याने ऐन महापुराच्या संकटामध्ये राजकिय वातावरण मोठ्या प्रमाणात तापले होते. त्यावर शिवसेना मंत्री, आमदार त्याचबरोबर उपमुख्यमंत्र्यांनी प्रतिउत्तर दिले होते. हे वातावरण थंड .../२



## तळीये गावाच्या तात्पुरत्या पुनर्वसनासाठी प्रशासनाकडून पर्यायी जागेची झाली पाहणी



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाड तालुक्यातील तळीये गावात दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर या गावाचे तात्पुरत्या स्वरूपात पुनर्वसन करण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. यासाठी पर्यायी जागा शोधण्याची कार्यवाही सुरू होती.

तळीये गावाजवळच एका ९० गुंठे पर्यायी जागेची प्रशासनाकडून आज पाहणी करण्यात आली. यावेळी जिल्हा परिषद सदस्य मनोज काळीजकर, तहसिलदार दिलीप रायन्नावार, पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता श्री.म्हात्रे, बांधकाम विभागाचे उपअभियंता श्री. देशमुख, तळीये गावचे सरपंच श्री. संपत तांडलेकर, उपसरपंच श्री.मस्के, इतर संबंधित अधिकारी कर्मचारी, आदी उपस्थित होते.

गावाच्या पुनर्वसनासाठी जी जागा पाहण्यात आली आहे, ती जागा तात्पुरत्या पुनर्वसनाकरिता देण्यासाठी सुरेखा तुळशीराम म्हस्के या संबंधित जागा मालकिणीने त्यांची नाहरकत प्रशासनाला तात्काळ लेखी दिली आहे. त्याचबरोबर या ठिकाणी पाणी, वीज पुरवठा होण्याबाबतची सुविधा उपलब्ध होईल किंवा कसे याबाबतचीही पाहणी पाणीपुरवठा व महावितरणच्या अधिकाऱ्यांनी केलेली आहे. या जागेस त्यांच्याकडूनही संमती देण्यात आली आहे. या कामाकरिता .../२

### कर्नाळा व फणसाड अभयारण्यात होणार पर्यटक मार्गदर्शक प्रशिक्षण उपक्रमाचा शुभारंभ

## स्थानिक युवक-युवतींनी प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा : ना.आदिती तटकरे



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यातील कर्नाळा पक्षी अभयारण्य व फणसाड अभयारण्य परिसरातील स्थानिक आदिवासी समाजातील बेराज-गार युवक-युवतींना दि. ०२ ते ०६ ऑगस्ट २०२१ रोजी राष्ट्रीय पातळीवरील गाईड निर्माण करणाऱ्या आयआयटीटीएम या भारत सरकार मान्यता प्राप्त संस्थेमार्फत प्रशिक्षण कार्यक्रम पनवेल येथील कर्नाळा पक्षी अभयारण्य येथे आयोजित केला आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी स्थानिक तरुण-तरुणींनी उत्तम प्रतिसाद द्यावा व पर्यटक मार्गदर्शक (गाईड)चे कौशल्य आत्मसात करावे, असे आवाहन पर्यटन राज्यमंत्री तथा पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी केले आहे.

महाराष्ट्र हे पर्यटनदृष्ट्या संपन्न राज्य आहे. पर्यटनावर आधारित विविध उद्योगधंदे पर्यटनस्थळी व तीर्थक्षेत्र स्थळी विकसित होत आहेत. त्याचप्रमाणे पर्यटनस्थळी तज्ञ पर्यटक मार्गदर्शक(गाईड) हा उत्तम पर्याय विकसित होत आहे. स्थानिक पातळीवरील मार्गदर्शन विषयक ज्ञान, कौशल्य आत्मसात करुन त्याच्या सहाय्याने राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यटन व्यवसाय व रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात, त्यासाठीचे कौशल्य आत्मसात करण्याची संधी पर्यटन विभाग स्थानिकांना देत आहे, असे मत पर्यटन राज्यमंत्री कु.आदिती तटकरे यांनी प्रशिक्षण उपक्रमाबाबत माहिती देतेवेळी व्यक्त केले.

जिल्ह्यातील कर्नाळा पक्षी अभयारण्य व फणसाड अभयारण्य या ठिकाणी .../२

## केंद्र सरकारच्या विरोधात आवाज उठवणाऱ्यांचा आवाज दाबला जातो : आ.नाना पटोले

**दै.रायगड नगरी । पुणे**

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी पुन्हा एकदा केंद्रातील मोदी सरकारवर घणाघाती टीका केली आहे. 'देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात ज्यांचे कोणतेही योगदान नाही ते लोक इतिहासाची मोडतोड करून चुकीचा इतिहास मांडून लोकांची दिशाभूल करत आहेत. ज्यांनी भारतमातेचे नाव घेऊन सत्ता मिळवली तेच आता भारतमातेला विकायला निघाले आहेत,' अशा शब्दांत नाना पटोले यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला.



स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त प्रदेश काँग्रेसच्या वतीने 'व्यर्थ न हो बलिदान' या अभियानाचे उद्घाटन पुण्यातील केसरी वाड्यातून करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. पटोले पुढे म्हणाले की, इंग्रजांचे सरकार जुलमी, अन्यायी अत्याचारी होते, स्वातंत्र्यचळवळ मोडून काढण्यासाठी त्यांनी अनन्वीत अत्याचार केले पण लोक डगमगले नाहीत. गो-या पोलिसांच्या गोळ्यांनाही घाबरले नाहीत. ते परकीय होते पण आत्ताचे केंद्रातील सरकार इंग्रज सरकारपेक्षा काही वेगळे नाही. इंग्रज शासक व आत्ताचे सत्ताधारी सारखेच आहेत. तेही जुलुम करायचे आणि हेही तेच करत आहेत. लोकमान्य टिळकांनी इंग्रज सरकार विरोधात .../२

# नवी मुंबईला अविरत पाणी पुरवठा : नगर नियोजनातील सिडकोचा नवा अध्याय

झपाट्याने शहरीकरण होण्याच्या या युगात शहरांच्या सीमा दिवसेंदिवस विस्तारत असून शहरांतील लोकसंख्या वेगाने वाढत आहेत. एकीकडे वाढती लोकसंख्या व दुसरीकडे घटणारे जलस्त्रोत, असे व्यस्त प्रमाण असल्याने वाढत्या लोकसंख्येला पुरेसा पाणी पुरवठा करण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. नवी मुंबईही त्यास अपवाद नाही. सर्व पायाभूत सोयी सुविधांनी परिपूर्ण असणाऱ्या या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शहरास राज्यातील तसेच देशातील नागरिक वास्तव्यासाठी नेहमीच प्राधान्य देत आले आहेत. यामुळे नवी मुंबई क्षेत्राची लोकसंख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. नवी मुंबई क्षेत्रातील नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळता, पनवेल महानगरपालिका आणि सिडको अधिकार क्षेत्रातील नोड व गावांना पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी सिडकोवर आहे.

दक्षिण नवी मुंबईतील पनवेल आणि उरण तालुक्यांतील लोकसंख्या २० लाखांपर्यंत आहे. दक्षिण नवी मुंबईतील खारघर, तळोजा, नवीन रोडपाली, कामोठे, कळंबोली, उलवे आणि द्रोणागिरी या नोडमध्ये सिडकोची महागृहनिर्माण योजना तसेच विविध महत्त्वाचे प्रकल्प साकारण्यात येत आहेत. या भागातील निवासी क्षेत्रांची पाण्याची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच नवी मुंबईची वाढती लोकसंख्या आणि सिडकोतर्फे साकारण्यात येत असलेले नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, महागृहनिर्माण योजना आणि नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र (नैना) या प्रकल्पांमुळे सन २०५० पर्यंत नवी मुंबई क्षेत्रातील पाण्याची अंतिम मागणी १२७५ दशलक्ष लीटर प्रति दिन (एमएलडी) पर्यंत असणार आहे. पाण्याची ही वाढीव मागणी पूर्ण करण्यासाठी, अस्तित्वात असलेल्या जलस्त्रोतांचा पूर्ण क्षमतेने वापर करणे व नवीन जलस्त्रोतांचे नियोजन करणे, अशी आखणी सिडकोने केली आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या (मजीप्र) न्हावा शेवा पाणी पुरवठा योजनेच्या तिसऱ्या टप्प्यातील ६९ एमएलडी पाणी सिडको नोडकरिता राखीव ठेवण्यासाठी, सिडको महामंडळ या प्रकल्पाकरिता रु. ११८.७६ कोटी इतके भांडवली अंशदान देणार आहे. यामुळे सिडको अधिकारक्षेत्रातील पाण्याची वाढीव मागणी पूर्ण करणे शक्य होणार आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या न्हावा शेवा योजनेतून सिडकोला ८५ एमएलडी पाण्याचा पुरवठा अपेक्षित असला, तरी काही तांत्रिक त्रुटींमुळे प्रत्यक्षात ७० एमएलडी पाणी सिडकोच्या वाट्याला येते. या तांत्रिक त्रुटी दूर करून, पाण्याच्या पंपिंगची क्षमता वाढवण्याकरिता, मजीप्रकडून आवर्धनचा तिसरा टप्पा २०१५ मध्ये प्रस्तावित करण्यात आला होता. या टप्प्यांतर्गत पाणी पुरवठा योजनेची क्षमता १०० एमएलडीवरून २२८ एमएलडीपर्यंत वाढविण्यात येणार आहे.

करंजाडे, काळुंद्रे आणि विमानतळ पुनर्वसन आणि पुन:स्थापना क्षेत्रातील गावांना पाणी पुरवठा करण्याकरिता नवीन योजनेतील ३५ एमएमलडी पाणी साठा सिडकोकरिता राखीव ठेवण्यात येणार आहे. तसेच एमएमआरडीएकडून नैना क्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या गृहनिर्माण योजनांकरिता, एमएमआरडीसाठी नवीन योजनेतील ५३ एमएलडी पाणी साठा आरक्षित करण्यात आला होता. परंतु ५३ एमएलडीपैकी ३४ एमएलडी पाणी साठ्यावरील हक्क एमएमआरडीएने सोडून दिल्याने हा पाणी साठाही सिडकोकरिता उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामुळे सिडकोला न्हावा शेवा पाणी पुरवठा योजनेच्या तिसऱ्या टप्प्यातून ६९ एमएलडी इतका अतिरिक्त पाणी साठा उपलब्ध होणार आहे.

सिडकोकडून पनवेल, कळंबोली, खारघर, कामोठे, उलवे, द्रोणागिरी, काळुंद्रे, तळोजा पंचनंद, न्हावडे फेज-२ आणि हेटवणे पाणी पुरवठा योजनेच्या मार्गावरील गावांना पाणी पुरवठा करण्यात येतो. सद्यस्थितीत सिडकोला हेटवणे पाणी पुरवठा योजना, मजीप्रचे पाताळगंगा, नवी मुंबई महानगरपालिकेचे मोरबे धरण आणि एमआयडीसीचे बारवी धरण यांद्वारे एकूण २५९ एमएलडी पाणी उपलब्ध होते, परंतु प्रत्यक्षात सिडको पाणी पुरवठा करत असलेल्या क्षेत्रात पाण्याची मागणी २८९ एमएलडी इतकी आहे. सन २०३१ पर्यंत या क्षेत्रात पाण्याची मागणी ७८६ एमएलडीपर्यंत वाढणार आहे. त्याचप्रमाणे, सिडको नवी मुंबईलगत विकसित करत असलेल्या नैना क्षेत्रातील २७० गावांना पाणी पुरवठा करण्याची जबाबदारीही सिडकोवर असणार आहे. यामुळे सन २०५० पर्यंत नैना क्षेत्र व सिडको प्रशासित नोड मिळून पाण्याची मागणी १२७५ एमएलडी इतकी असणार आहे.

भविष्यातील पाण्याची ही वाढती मागणी पुरी करण्यासाठी सिडकोने विविध स्रोतांद्वारे, जसे- हेटवणे पाणी पुरवठा योजनेतून २७० एमएलडी, पाताळगंगेवरील न्हावा शेवा पाणी पुरवठा योजनेच्या आवर्धनाद्वारे ६९ एमएलडी आणि सिडकोच्या बाळगंगा धरणातून ३५० एमएलडी पाणी पुरवठ्याचे नियोजित केले आहे. परंतु सध्या अस्तित्वात असलेल्या या स्त्रोतांद्वारे भविष्यातील पाण्याची वाढती मागणी पूर्ण करणे अशक्य आहे हे जाणून सिडकोने २०१५ मध्ये, कोकण पाटबंधारे महामंडळाच्या अखत्यारीतील कोंढाणे धरण आपल्याला हस्तांतरीत करण्यात यावे, अशी मागणी राज्य शासनाकडे केली.

कोंढाणे धरण हे रायगड जिल्ह्याच्या कर्जत तालुक्यामध्ये असून त्याची साठवण क्षमता २५० एमएलडी एवढी आहे. यानंतर, २०१७ मध्ये राज्य शासनाकडून, सिडकोच्या नैना शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी, सिडकोला 'जे आहे, जेथे आहे' तत्त्वावर कोंढाणे धरण हस्तांतरीत करण्यात आले. कोंढाणे धरणाच्या आजवर झालेल्या कामाकरिता, सिडकोने कोकण पाटबंधारे महामंडळाला रु. ९९.१५ कोटी रक्कम अदा केली. उर्वरित प्रकल्प पूर्ण करण्याकरिता रु. ३,०७२ कोटी खर्च अंदाजित आहे. पूर्णत्वास गेल्यानंतर या धरणाची क्षमता २५० एमएलडी एवढी असणार आहे. प्रकल्पाशी संबंधित सर्वेक्षण, मृदा परीक्षण, जमीन संपादन, पर्यावरण व वनविषयक मंजुरी, पुनर्वसन इ. प्रांरभिक कामे पार पाडण्याकरिता आणि प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरिता सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे. कोंढाणे धरण प्रकल्पाचा बृहद् आराखडा तयार करणे, तपशीलवार सर्वेक्षण करणे, विविध घटकांचे द्रवचलित, संरचनात्मक व विद्युतयांत्रिक संकल्पन तयार करणे, या कामांकरिता सल्लागार सेवा पुरविण्याकरिता सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे. सल्लागार कामांमध्ये प्राथमिक व द्वितीयक माहिती संकलन, उपलब्ध माहितीचा सविस्तर अभ्यास, पूर्व-सुसाध्यता व सुसाध्यता अहवाल तयार करणे, जल संस्करण संयंत्रांकरिता (वॉटर ट्रीटमेन्ट प्लॅन्ट) आवश्यक ती यंत्रणा उभारणे, यांचा समावेश आहे. या कामांकरिता रु. १,९७,२२,००० इतका खर्च अंदाजित आहे.

कोंढाणे धरण प्रकल्पाचे संकल्पन आणि आरेखन करण्याचे काम मुख्य संकल्पन अधिकारी, जलसंपदा विभाग, नाशिक यांना सोपविण्यात आले आहे. या कामाकरिता सिडकोकडून रु. २,४९,८०,००० एवढे चाचणी शुल्क (व्हेटिंग चार्जेस) कार्यकारी अभियंता, संकल्पन विभाग, नाशिक यांना अदा करण्यात येणार आहे.

दक्षिण मुंबईतील पाणी पुरवठा यंत्रणेला अधिक बळकटी देण्यासाठी हेटवणे धरणातील अतिरिक्त १२० दशलक्ष लीटर प्रति दिन (एमएलडी) पाणी साठा आरक्षित करण्यासाठी कोकण पाटबंधारे विकास महामंडळाला रु. ११९.८० कोटी शुल्क सिडकोकडून देण्यात येणार आहे. अन्य योजना पूर्ण होण्यासाठी लागणारा वेळ लक्षात घेऊन, सध्याच्या परिस्थितीत हेटवणे धरणातून तातडीने अतिरिक्त पाणी साठा मंजूर करून घेण्याचा निर्णय सिडकोकडून घेण्यात आला आहे. सद्यस्थितीत नवी मुंबईतील पनवेल महानगरपालिका क्षेत्र, सिडको अधिकार क्षेत्रातील काही नोड व नजीकच्या परिसरातील गावे यांना हेटवणे धरणातून पाणी पुरवठा करण्यात येतो. सिडकोतर्फे २००१-०२ या वर्षी रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यामध्ये हेटवणे पाणी पुरवठा योजना साकारण्यात येऊन रु. ४७.०० कोटी भांडवल अंशदानाच्या बदल्यात सिडकोला या धरणातील प्रक्रिया न केलेला १०० एमएलडी पाणी साठा उपलब्ध करून देण्यात आला. त्यानंतर २०१५ मध्ये रु. १४८.८१ कोटी भांडवली अंशदानाच्या बदल्यात सिडकोला अतिरिक्त ५० एमएलडी पाणी साठा उपलब्ध करून देण्यात आला. सद्यस्थितीत हेटवणे धरणातून सिडकोला १५० एमएलडी पाणी साठा उपलब्ध होत आहे. हेटवणे धरणातील १२० एमएलडी अतिरिक्त पाणी साठा मंजूर झाल्याने २०२५ पर्यंत प्रस्तावित असणाऱ्या विविध प्रकल्पांची पाण्याची मागणी पूर्ण होणार आहे. हेटवणे पाणी पुरवठा योजनेतून मंजूर झालेला अतिरिक्त १२० एमएलडी पाणी साठ्याचा वापर करण्यासाठी, हेटवणे योजनेचे आवर्धन करून योजनेची क्षमता २७० एमएलडीपर्यंत वाढवणे आवश्यक आहे. याकरिता पार पाडावयाच्या तांत्रिक कामांसाठी सिडकोकडून मे. टाटा कन्सल्टिंग इंजिनिअर्स लि. (टीसीई) यांची तज्ज्ञ सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. हेटवणे धरण येथील सिडको निर्गमावर (आउटलेट) प्रेशर कंड्यूटची व्यवस्था करण्याचा निर्णय घेण्यात आला असून या कामाकरिता कार्य पद्धतिशास्त्र, संकल्पन आणि आरेखनांसह सविस्तर अहवाल मे. टीसीई यांच्याकडून सादर करण्यात आला आहे. त्यानंतर, संकल्पनासह अहवाल कार्यकारी अभियंता (जलसंपदा विभाग) यांना सादर करण्यात आला.

मे. टीसीई यांच्या मते, हेटवणे योजनेचे आवर्धन पूर्ण होईपर्यंत सध्या अस्तित्वात आसलेल्या जल संस्करण संयंत्राचे आयुर्मान संपुष्टात येणार आहे व भविष्यातील २७० एमएलडी पाण्याची मागणी पूर्ण करण्याकरिता हे संयंत्र सक्षम नसेल. याकरिता बाळगंगा योजनेच्या जिते येथील जल संस्करण संयंत्राच्या उर्वरित मोकळ्या जागेवर, ३०० एमएलडी (२७० एमएलडी + ३० एमएलडी द्रवचालित अतिभार आणि हानी) क्षमतेचे जल संस्करण संयंत्र उभारणे व्यवहार्य ठरणार आहे. म्हणून सध्या अस्तित्वात असलेल्या हेटवणे पाणी पुरवठा योजनेच्या जल संस्करण संयंत्रालगत जिते येथे ३०० एमएलडी क्षमतेचे जल संस्करण संयंत्र उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बाळगंगा पाणी पुरवठा योजना दृष्टीपथात आल्यावर, सध्या अस्तित्वात असलेल्या जल संस्करण संयंत्राचे आवर्धन/खण्डकरण करण्याबाबत निर्णय घेतला जाईल.

हेटवणे धरणातून सिडको द्वारे आणले जाणारे पाणी अनेकदा डोंगर उतारावरून येत असल्याने कमी दाब आणि अल्प पुरवठा अशा समस्यांना सामोरे जावे लागत होते. तसेच जुनी जलवाहिनी ही पी एस सी कॉँक्रीटची असल्याने ती बदलून एम एस जलवाहिनी टाकणे गरजेचे होते. त्यामुळे सिडको तर्फे हेटवणे जलवाहिनी भूमिगत करण्याचे काम सुरू आहे. हेटवणे धरणा कडून शहराकडे येणाऱ्या जलवाहिनी साठी हमरापुर येथे टेकडीच्या खालून साधारण २० ते २५ मीटर खोलीवर बोगदा खोदण्याचे काम पूर्ण झाले आहे. या बोगद्याची लांबी ७०० मीटर असून १५०० मिलिमीटर व्यासाची एम एस जलवाहिनी टाकण्यात आली आहे. तसेच हेटवणे धरणावरील सिडकोच्या विमोचकातील दाब विरहित व्यवस्था बदलून तेथे दाब युक्त जलवाहिनीची व्यवस्था करण्याचे काम तातडीने हाती घेण्याचे प्रयोजन आहे. त्यासाठी तांत्रिक सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे. हे काम पूर्ण झाल्यावर हेटवणे धरणातून अतिरिक्त २० ते ३० एमएलडी पाणी नजीकच्या काळात उपलब्ध होईल.

सिडकोकडून करण्यात येत असलेल्या जलस्रोतांच्या या दूरगामी व काटेकोर नियोजनामुळे, नवी मुंबई क्षेत्राची वर्तमानातील तसेच भविष्यातील पाण्याची वाढती मागणी पूर्ण करण्यासह पाण्याचा अविरत पुरवठा करणे सुनिश्चित होणार आहे.

> नवी मुंबईची वाढती लोकसंख्या आणि नवी मुंबईमध्ये साकार होत असलेल्या महत्त्वाकांक्षी विकास प्रकल्पांमुळे, नवी मुंबई क्षेत्रात पाण्याची मागणी कैक पटींनी वाढणार आहे. पाण्याची वर्तमानातील तसेच भविष्यातील वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी सिडकोकडून पाणी पुरवठ्याच्या विविध योजना राबविण्यात येत आहेत. याकरिता उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन, जलस्रोतांचा पूर्ण क्षमतेने वापर आणि नवीन जलस्रोतांची निर्मिती, ही त्रिसूत्री निश्चित करण्यात आली आहे.
>
> **डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

# मुरुडमध्ये लोकन्यायालय : २६४११ प्रकरणे निकाली

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड दिवाणी व फौजदारी न्यायालय (क-स्तर)व मुरुड तालुका विधी सेवा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने न्यायाधीश सं.गं.सरोदे यांच्या अध्यक्षतेखाली लोकन्यायालय घेण्यात आले.

कोरोना रोगाच्या पार्श्वभूमीवर अन लॉकनंतर शासनाच्या अटि,शर्ती व नियमांचे पालन करुन घेण्यात आलेल्या या लोकन्यायालयाचा न्यायाधीश सं.गं.सरोदे मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन शुभारंभ करण्यात आला.

सदर लोकन्यायालयात बी.एस.एन.एल.,महावितरण, बँक ऑफ इंडिया, मुरुड नगरपरिषद, पंचायत समिती, मुरुड यांचे बरोबर न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांचा समावेश करण्यात आला होता.यावेळी प्री लिटिगेशन असलेली एकूण प्रकरणे५५८७० पैकी २६४१२ निकाली निघाली. मुरुड न.प.ची घरपट्टी, पाणीपट्टी रुपये,पंचायत समितीची रुपये वसुली, बँक तसेच बॅकांची वसुली रुपये ३०४४४१/-. वसूल करण्यात आली. दिवाणी व फौजदारी दाव्यातील प्रलंबित प्रकरणांपैकी एकूण फौजदारी ३२ प्रकरणे व दिवाणी प्रकरणे -०१ निकाली काढण्यात आली.लोकन्यायालय प्रमुख पंच म्हणून ड.मृणाल खोत व ड.मनाली सतविडकर यांनी काम पाहिले. सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.संजय राठोड, ड.संजय जोशी, ड.हुसेन, ड.डी.एन.पाटील,ड.कुणाल जैन,ड.रुपेश पाटील,ड, अजित चोगले,ड.मोहन तांबडकर, रेवदंडा पोलीस ठाण्याचे डी.डी.काकडे, मुरुड पोलीस ठाण्याचे इकबाल अत्तार, सहाय्यक अधिक्षक तनुजा म्हात्रे,भार्गव बेडेकर ,श्रावणी मोरे जयेश गुरव, सिद्धेश विरकुड व कर्मचारी वर्ग यांचे विशेष सहकार्य लाभले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## कळंबोलीत शिवसैनिकांनी आ. प्रसाद लाड यांचा पुतळा जाळला

होते तोच भाजपच्या आमदार प्रसाद लाड यांनी वेळ आली तर सेनाभवन फोडू, असं चिथावणीखोर वक्तव्य केलं. दक्षिण मध्य मुंबईत कोणताही मोर्चा असेल तिथे आम्ही येणार आहोत.मोर्चाला आम्ही आल्यावर तिथे कुणी थांबणार नाही. सेनच्या कुंडल्या आमच्याजवळ आहेत, शिवसेनेला वाटत की आम्ही माहीम मध्ये आल्यावर सेनाभवन फोडू तर त्यांना सांगतो की वेळ आली तर आम्ही सेनाभवन पण फोडू, असं चिथावणीखोर वक्तव्य प्रसाद लाड यांनी यावेळी केलं. त्याचे पडसाद मुंबईसह महाराष्ट्रात उमटले आहेत. शनिवारी कळंबोली येथे शिवसेनेचे पनवेल महानगर रामदास शेवाळे यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिकांनी कारमेल हायस्कूल चौकामध्ये दुपारी दोन वाजता आंदोलन केले. आमदार प्रसाद लाड यांचा पुतळा याठिकाणी जाळण्यात आला. त्याचबरोबर त्यांच्या प्रतिमेला शिवसैनिकांनी जोडे मारले. भाजप आणि लाड यांच्या विरोधात घोषणाबाजी करत शिवसेनेने शिवसेना भवन फोडू या वक्तव्याचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला. यावेळी पनवेल विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर, कळंबोली शहर प्रमुख डी.एन मिश्रा, सूर्यकांत म्हसकर, युवा सेनेचे अरविंद कडव, गिरीश धुमाळ, टिया आरोरा, बालाजी खोडेवाल यांच्यासह स्थानिक शिवसैनिक उपस्थित होते.

## स्थानिक युवक-युवतींनी प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा : ना.आदिती तटकरे

पर्यटक, पक्षी अभ्यासक व निसर्गप्रेमी यांची कायम पसंती असते. शालेय विद्यार्थ्यांच्या सहली, अभ्यास दौरे या दोन्ही पर्यटनस्थळी होत असतात. येथे येणाऱ्या पर्यटकांना अभयारण्यातील महत्त्वाच्या स्थळांचे अभ्यासपूर्ण मार्गदर्शन मिळावे, पर्यटन मार्गदर्शक म्हणून स्थानिक आदिवासी तरुण-तरुणींना प्राधान्याने रोजगार उपलब्ध व्हावा, अशी पर्यटन राज्यमंत्री तथा रायगड जिल्हा पालकमंत्री ना. कु.आदिती तटकरे यांची संकल्पना आहे. त्यानुसार भारत सरकारचा ऑनलाईन पर्यटन सुलभ मार्गदर्शक हा अभ्यासक्रम महाराष्ट्रातील बेरोजगार युवकांसाठी अधिकृतरित्या महाराष्ट्र शासनाने प्रमाणित करून सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यातील फणसाड अभयारण्य परिसरातील ११ व कर्नाळा पक्षी अभयारण्य परिसरातील २० याप्रमाणे एकूण ३१ आदिवासी स्थानिक युवक व युवतींना गाईड प्रशिक्षण देण्यात येणार आहे. हे प्रशिक्षण वर्ग पर्यटन संचालनालयामार्फत आयोजित करण्यात येणार आहेत. त्यासाठी संचालक, डॉ.धनंजय सावळकर, पर्यटन विभाग, यांनी पुढाकार घेतला आहे. रायगड जिल्ह्यास लाभलेले वैविध्यपूर्ण निसर्ग सौंदर्य, अद्वितीय ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा यामुळे रायगड जिल्ह्यात येणाऱ्या पर्यटकांचा ओघ जास्त आहे. फणसाड व कर्नाळा पक्षी अभयारण्य इथे येणाऱ्या प्रत्येक पर्यटकाला एक समृध्द व आल्हाददायक अनुभव देण्याचा पर्यटन राज्यमंत्री तथा रायगड पालकमंत्री ना. कु. आदिती तटकरे यांचा प्रयत्न आहे. भटकंती, प्रवास हा फक्त एक छंद म्हणून न जोपासता त्याला शैक्षणिक आणि व्यावसायिक जोड देण्याचा विचार करणाऱ्या राज्यातील इच्छुक युवक-युवतींसाठी पर्यटक मार्गदर्शक प्रशिक्षण ही संकल्पना सुरु करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत पर्यटनाची आवड असणाऱ्या होतकरु तरुण-तरुणींना पर्यटक मार्गदर्शक प्रशिक्षण देऊन टुरिस्ट गाईड म्हणजेच पर्यटन मार्गदर्शक घडविले जाणार असून या प्रशिक्षण उपक्रमास प्रत्यक्ष उपस्थित राहून प्रशिक्षणार्थींना शुभेच्छा देण्यास मला निश्चितच आनंद होईल, असेही कु.तटकरे म्हणाल्या आहेत.

## शासनाकडून पर्यायी जागेची झाली पाहणी

जिल्हाधिकारी निधी चौधरी व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार दिलीप रायन्नावार हे समन्वयकाची जबाबदारी पार पाडीत आहेत.

## केंद्र सरकारच्या विरोधात आवाज उठवणाऱ्यांचा आवाज दाबला जातो

'सरकारचं डोकं ठिकाणावर आहे का'? असा जळजळीत लेख लिहिला म्हणून त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरला. आजचे सरकारही तेच करत आहे. केंद्र सरकारच्या विरोधात आवाज उठवणाऱ्यांचा आवाज दाबला जात आहे. प्रसारमाध्यमांचीही मुस्कटदाबी केली जात आहे.जो सरकारच्या विरोधात बोलेल, लिखाण करेल त्याच्यावर कारवाईचा बडगा उगारला जात आहे. संविधानाने आपल्याला बोलण्याचा अधिकार दिला आहे. जेथे अन्याय दिसेल त्याविरोधात आवाज उठवलाच पाहिजे. लोकशाहीच्या चार स्तंभातील न्यायपालिकेची अवस्था काय करून ठेवली आहे हे आपण पहातच आहोत. स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेसने जुलमी, अत्याचारी व हुकूमशाही राजवटीविरोधात मोठा लढा दिला. सुरुवातीला लोकमान्य टिळक यांच्या जहाल व महात्मा गांधींच्या मवाळ अश्या दोन्ही मार्गांनी या लढ्यात असंख्य स्वातंत्र्यवीरांनी बलिदान दिले. स्वातंत्र्यपूर्व काळात सुरु असलेली ब्रिटिश राजवटीची हुकूमशाही प्रेरणादायी चळवळीच्या माध्यमातून उलथवून टाकून काँग्रेसने नंतर या देशात लोकशाही व धर्मनिरपेक्ष व्यवस्था रुजवली. पंडित नेहरु, सरदार पटेल, मौलाना आझाद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदींनी देश उभारणीत मोठे योगदान दिले. आजच्या विद्यमान केंद्र सरकारने देशाच्या या एकात्मिक व्यवस्थेला व लोकशाहीला सुरुंग लावण्याचे काम सुरु केले आहे. त्यामुळे केंद्र सरकारला चोख प्रत्युत्तर देण्यासाठी व नवीन पिढीला काँग्रेसचा इतिहास कळावा म्हणून 'व्यर्थ न हो बलिदान' हे अभियान स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तरीत पदार्पण करत असताना संपूर्ण राज्यभर राबविले जाणार आहे. या अभिमानात मोठ्या संख्येने सहभागी व्हा', असं आवाहन पटोले यांनी केले.

# माथेरान मधील अहिल्याबाई होळकर चौकास तीन वर्षे पूर्ण



**दै.रायगड नगरी । माथेरान**

सातत्याने समाजासाठी त्याचप्रमाणे माथेरान मधील नागरिकांच्या सार्वजनिक विषयावर नेहमीच पुढाकार घेत आखलेल्या कामास योग्य प्रकारे तडीस नेण्यासाठी कटिबद्ध असणारे येथील धनगर समाजाचे कार्यशील अध्यक्ष अश्वपाल संघटनेचे उभरते खंबीर युवा कार्यकर्ते राकेश कोकळे यांनी राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या नावाचा चौक महात्मा गांधी मार्गावरील एका बाजूला असलेल्या जागेवर समाजाच्या बांधवांसोबत आपल्या कार्यकाळात उभारला आहे त्यास दि.१ ऑगस्ट रोजी तीन वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्ताने एखादा सुंदर कार्यक्रम आयोजित करण्याची प्रबळ इच्छाशक्ती असताना देखील शासन नियमांच्या अटी आणि शर्थीचे पालन करीत अगदी साधेपणाने साजरा करण्यात येणार असल्याचे राकेश कोकळे यांनी सांगितले आहे.

गावात आजवर अनेक संघटना, मंडळे,संस्था अस्तित्वात आहेत परंतु नागरिकांना भेडसावत असलेल्या समस्येवर अथवा सर्वसामान्य लोकांना उद्भवणाऱ्या अडीअडचणी यांचे निराकरण करण्यासाठी सहसा तरी कुणी पुढे येत नाहीत परंतु राकेश कोकळे हे प्रत्येक समस्येवर शासन दरबारी पाठपुरावा करून त्यातून सकारात्मक बदल घडवून आणण्यामध्ये राकेश कोकळे यांचा हातखंडा आहे. गावातील लोकांची कामे करताना आपल्या समाजाला सुध्दा विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी त्याचा पुढाकार असतो यासाठी समाजाला एकत्रित आणून त्यांनी तीन वर्षांपूर्वी राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या नावाने चौक उभारला आहे त्यास दि.१ ऑगस्ट रोजी तीन वर्षे पूर्ण होत आहेत.

# महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन, तालुका शाखा पनवेल व पंचायत समिती पनवेल यांच्यातर्फे पूरग्रस्तांना मदत



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पूरग्रस्तांना मदत करण्यासाठी महाडमध्ये सामाजिक, राजकीय संस्थांसह व्यक्ती तसेच विविध ज्ञाती संस्थांकडून मदतीचा ओघ येत आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन, तालुका शाखा पनवेल व पंचायत समिती पनवेल, रायगड जिल्हा परिषद अभियंता, महाराष्ट्रीयन बिल्डर्स असोसिएशन यांच्यातर्फे पूरग्रस्तांना मदत करण्यात आली

पावसाने हाहा:कार घातल्यानंतर रायगड जिल्ह्यात महाड आणि पोलादपूर तालुक्यात त्याचा सर्वात मोठा फटका बसल्याचं पाहायला मिळत आहे. महाडमध्ये महापुरासह तळीये गावात दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेनं संपूर्ण महाराष्ट्र हादरला होता. या दुर्घटनेत ८० पेक्षा जास्त नागरिकांचा मृत्यू झालाय. रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील सावित्री नदीला ढगफूटी सदृश्य अतीमुसळधार पावसाने, महापूर परीस्थिती निर्माण केली होती . सावित्री नदीला आलेल्या महापूरामुळे महाड शहर पुर्णपणे पाण्याखाली गेलं. पावसाने विश्रांती घेतल्याने आता पुराचे पाणी ओसरण्यास सुरुवात झाली आहे. महाड शहारातील दहा हजारहून अधीक नागरिक महापुराच्या पाण्याने वेढले गेले होते. येथील नागरिकाना अनेकानी मदत केली. महाड तालुक्यातील अतिवृष्टीमुळे बाधित पूरग्रस्त बांधवांना अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तूंची मदत महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन, तालुका शाखा पनवेल व पंचायत समिती पनवेल यांच्यातर्फे करण्यात आली. रायगड जिल्हा परिषद अभियंता यांचे मार्फत महाड तालुक्यातील पूरग्रस्तांना जीवनावश्यक वस्तूंची मदत करण्यात आली. महाराष्ट्रीयन बिल्डर्स असोसिएशन यांच्यातर्फे महाड, चीपळून येथील पुरग्रस्तांना मदतीचा हात देण्यात आला. पूरग्रस्तांना मदत म्हणून साहित्याचे वाटप करण्यात आले. या वेळी अध्यक्ष संतोष आंबवणे यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

# राजेश पांडे यांचा वाढदिवस मान्यवरांच्या उपस्थितीत साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उत्तर भारतीय शिवसेना युवा नेते राजेश पांडे जे राहण्यास कळंबोली येथे आहेत. यांचा वाढदिवस अनेक राजकीय, चित्रपट विभाग, सामाजिक कार्यकर्ते व विविध संस्थेच्या माध्यमातून कळंबोलीसह नवीमुंबई, मुंबई आदी विभागात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

राजेश पांडे यांना अनेक मान्यवरांनी वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. त्यामध्ये प्रामुख्याने युवा सेना प्रमुख ना.आदित्य ठाकरे, राष्ट्रीय संघटक अशोक तिवारी, राष्ट्रीय युवा वाहिनीचे अजय शर्मा, आ.सुनील प्रभु, आ.रमेश लटके, खा.गजानन किर्तीकर, खा.राहूल शेवाळे, आ.मंगेश कुडाळकर व अयोध्याचे आ.गोरखनाथ बाबा, सिनेसृष्टीमधून मेहुल भोजाक, संजय पांडे, गिरीश थापर, सागरिका नेहा, ओम त्रिपाठी, विशाल ओमप्रकाश, कॉमेडीयन राजकुमार कनोजिया, बेस्ट कॉमेडीयन व्हिआयपी, राष्ट्रीय युवा वाहिनी महाराष्ट्र प्रभारी अजय शर्मा, भारत भ्रष्टाचार मिटवा पार्टीचे प्रदेशाध्यक्ष एस.एन.पांडे यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा देवून त्यांनी आतापर्यंत उत्तर भारतीय यांचे विविध प्रश्न, समस्या शिवसेनेच्या माध्यमातून सोडविल्याबद्दल कौतुक केले आहे.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करून धिंगाणा घालणाऱ्यांवर कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करून आरडाओरडा करून सार्वजनिक शांततेचा भंग केल्याप्रकरणी एका इसमाविरोधात कामोठे पोलिसांनी कारवाई केली आहे.

समीर कदम (४२ रा.कामोठे) या इसमाने दारुच्या अंमलाखाली सार्वजनिक ठिकाणी प्रवेश करून सार्वजनिक ठिकाणी लोकांना तसेच पोलिसांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळी व मोठमोठ्याने आरडाओरडा करून सार्वजनिक शांततेचा भंग केला म्हणून त्याच्या विरोधात कामोठे पोलिसांनी मुंबई दारुबंदी अधिनियम कलम ८५ (१) प्रमाणे कारवाई केली आहे.

## अखिल भारत हिंदू महासभेच्या वतीने जेष्ठ पत्रकार नवीन सोष्टे यांना भावपुर्ण आदरांजली

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रायगड जि.मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष, विद्यमान सल्लागार, जेष्ठ साहित्यिक, लेखक तथा पत्रकार नवीनचंद्र सोष्टे यांचे नुकतेच वयाच्या ६९ व्या वर्षी दु:खद निधन झाले आहे. त्यांच्या निधनाबद्दल अखिल भारत हिंदू महासभेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

अखिल भारत हिंदू महासभेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रम प्रसंगी प्रदेशाध्यक्ष अरुण माळी, रा.जिल्हाध्यक्ष मधुकर खामकर, रोहे तालुका अध्यक्ष विलास धामणसे, तर जिल्हा पदाधिकारी शैलेश शिलकर, प्रशांत सुतार, संतोष निकम, वैभव शेडगे, गजेंद्र तुडबरकर, निकेश भोईर, परेश सिलिमकर, वैभव शेडगे, मिलिंद भोईर, प्रशांत गोरे, श्रीवर्धन महिला अध्यक्षा भारती शहा आदी उपस्थित होते.



जिल्हा संघाचे माजी अध्यक्ष तथा जेष्ठ साहित्यिक नवीनचंद्र सोष्टे हे रायगड जिल्ह्यातील जेष्ठ पत्रकार व रायगड जिल्ह्याचे भूषण होते. त्यांनी आपल्या धारदार लेखनीतून तळागाळातील सामान्य जनतेचे प्रश्न नेहमीच व्रुत्तपत्रातून मांडून न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या निधनाने पत्रकारिता साहित्य क्षेत्राची कधीही न भरून येणारी हानी झाली असल्याचे मनोगत प्रदेशाध्यक्ष अरुण माळी यांनी यावेळी व्यक्त केले.

## म्हसळ्यात कोरोना रुग्णसंख्या कमी होऊ लागली

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यातील कोव्हीड १९ रुग्णसंख्या कमी होऊ लागली आसल्याची माहीती तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शरद गोसावी यानी दिली . तालुक्यात आज फक्त एक रुग्ण पाझीटीव्ह सापडला तर तब्बल १० रुग्णानी करोनावर मात केल्याचे सांगण्यात आले.

तालुक्यात आजपर्यंत कोरोना बाधीत ९७७, उपचार सुरु असलेले केवळ २५ रुग्ण आहेत. आजपर्यंत ९०३ रुग्णानी कोरोनावर यशस्वी मात केली.

म्हसळा शहर १० रुग्ण बाधीत आहेत, तालुक्याचे ग्रामिण भागातील १५रुग्ण बाधीत आहेत, ते पुढील प्रमाणे वारळ २, निगडी २, मरीयामखार ६, वरवठणे २, घूम १, खरसई १, तुरूंबाडी १असे आहेत.

## पनवेलमध्ये रिक्षाची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहरातील बँक ऑफ बडोदा जवळ उभी करून ठेवलेली रिक्षा अज्ञात चोरट्यांनी चोरी करून नेल्याची घटना घडली आहे.

शेहबाज कय्युम पटेल (३०) यांची ७५ हजार रुपये किंमतीची काळ्या व पिवळ्या रंगाची ऑटो रिक्षा क्र.एमएच-४६-बीडी-४०९७ ही टपालनाका बँक ऑफ बडोदा परिसरात उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी चोरी करून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### जाहीर नोटीस

तमाम पंचक्रोशीतील जनतेला या नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची मिळकत ही आमचे अशिलांनी जमिनीचे मालक यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे**

| गावाचे नांव | जमीन मालकाचे नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र (हेक्टर आर) | आकार |
|---|---|---|---|---|
| लोणिवली, ता.पनवेल, जि.रायगड | जगन्नाथ शंकर लाड व इतर १९ | १/२ | १-५६-० पो.ख.१-०६-० एकूण २-६२-० | ३.२५ |

या वरील मिळकतीचे मालकांशी आमचे अशिलांचा जमीन खरेदी करणेबाबत व्यवहार ठरलेला आहे. या मिळकतींशी कोणीही व्यक्ती, संस्था, बँक, सामाजिक संस्था यापैकी व इतर कोणाचाही कसलाही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत या त्याबाबत आम्हाला कळवावे. दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत नसल्यास कोणाचाही सदर मिळकतीत कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही व आमचे अशिलावरील नमूद मालकांशी सदर मिळकतीसंदर्भात ठरलेला खरेदीचा व्यवहार पूर्ण करू. मुदतीनंतर कोणाचीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

दि.०२/०८/२०२१
ठिकाण : पनवेल

**सही/-**
**ॲड.सतिश चं. काळे**
**३०६ गणेश टॉवर, मोठा खांदा**
**से.१७, पनवेल-४१०२०६**
**मो.नं.९८८१७८९८८८**

### जाहीर नोटीस

आमच्या अशिलांनी सांगितल्याप्रमाणे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, मौजे : चिरनेर, ता.उरण, जि.रायगड येथील वेश्वी ग्रामपंचायत हद्दीतील खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या जमीन मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : चिरनेर, ता.उरण, जि.रायगड**

| गाव/तालुका | गट / सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| चिरनेर, उरण | १०३ | ५/अ | ०-१६-३० पो.ख. ०-०१-०० ०-१७-३० | ३.१२ |

वर वर्णन केलेल्या मिळकती श्री.जनार्दन रामा पाटील, वय : ८३ वर्षे, धंदा : शेती, आधार नं.४५९४ ०२८६ १९३३, रा.४०२-१ मधीलपाडा, चिरनेर, ता.उरण, जि.रायगड यांचे ताबेकब्जातील व वहिवाटीखालील जमीन मिळकती आहेत. सरची मिळकतीचा विक्री व्यवहार करावयाचा आहे. वरील वर्णन केलेल्या मिळकती अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, भाडेपट्टा, लिज, तबदील, ट्रस्ट, गहाण कुळ वारस इ.कोणत्याही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०८ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खालील सही करणार यांच्याकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकती निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रार, दावे बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : उरण
दि.०१/०८/२०२१

**सही/-**
**ॲड.श्री.मनोज शंकर गाढवे**
**शॉप नं.३, यशोकिरण बिल्डींग,**
**सावरकर चौक, पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८७७९६३७९२**

## रायगड जिल्ह्यात आदिम जमातीचे बहुउद्देशीय संकुल उभारणीची प्रक्रिया प्रगतीपथावर

# मदत नव्हे कर्तव्य ; शिवसेना उरण तालुका व शहराच्या वतीने महाड-पोलादपूर पूरग्रस्तांसाठी मदत

**दै.रायगड नगरी । उरण**

राज्यात अतिवृष्टी व महापुरामुळे रायगड जिल्ह्यातील महाड-पोलादपूर तालुक्यातील अनेक गावे उध्वस्त झाली असून अनेक ठिकाणी अन्य-धान्य जीवनावश्यक वस्तु यांची खुप आवश्यकता आहे. शिवसेना पक्षप्रमुख व मुख्यमंत्री श्री उध्दव ठाकरे यांनी या पूरग्रस्तांना मदतीचे आवाहन केले आहे. त्यांच्या आदेशाचे पालन करत, शिवसेना उरण तालुका व शहराच्या वतीने महाड-पोलादपूर पूरग्रस्तांसाठी मदत पाठविण्यात आली आहे.



यामध्ये तांदूळ, गहू, साखर, तेल, चहा व दुध पावडर, पीठ,ब्लॅकेट, चादरी, टी-शर्ट, बरमुडा,कपडे , पिण्याचे पाणी ,औषधे, धान्य, साबण, मेणबत्ती, लायटर, मच्छर अगरबत्ती, सॅनिटरी नॅपकिन, मास्क ,सॅनिटायझर्स,टॉवेल, साड्या, बिस्किटे, वह्या-पुस्तके,शालेय साहित्य व किराणा सामान अशा विविध जीवनावश्यक वस्तू मदत शिवसेना शहर शाखा, गणपती मंदिर जवळ, उरण येथून आज शनिवार दिनांक ३१ जुलै २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता शिवसेना जिल्हाप्रमुख माजी आमदार श्री मनोहरशेठ भोईर यांच्या नेतृत्वाखाली महाड- पोलादपूर तालुक्यासाठी रवाना झाला.

या वेळी माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांनी शिवसेना उरण तालुक्यातील व शहरातील सर्व पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, महिला आघाडी, युवासेना, अंगीकृत संघटनेचे पदाधिकारी, सामाजिक व वैद्यकीय संघटना, सेवाभावी संघटना व व्यापारी वर्ग व ज्यांनी हया सामाजिक कार्यात मदत केली आहे, त्या सर्वांचे आभार मानले आहेत.

यावेळी उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर, तालुकाप्रमुख संतोष ठाकूर, उरण नगरपालिकेचे शिवसेना गटनेते गणेश शिंदे, कामगार नेते महादेव घरत, शहर संपर्क प्रमुख गणेश म्हात्रे, शहरप्रमुख विनोद म्हात्रे, म्हात्रे, नगरसेवक अतुल ठाकूर, माजी नगराध्यक्ष परमानंद करगुटकर, उपतालुकाप्रमुख जयवंत पाटील, उपतालुका संघटक के एम घरत, अमित भगत, मनोज पाटील, एस के पुरो, धनेश ठाकूर, संदीप जाधव, धीरज बुंदे, कैलास पाटील, एजाज मुकादम, रफिक मुल्ला,प्रदीप शेळके, धनाजी भोईर, रवीद्र पाटील, अनिल पाटील, इस्माईल शेख, महेश वर्तक, शिक्षक सेनेचे कौशिक ठाकूर, महेश गावंड, महिला संघटिका (शहर) श्रीमती सुजाता गायकवाड, शहर संघटिका सौ मेघा मेस्त्री, शहर संपर्क संघटिका सौ श्रद्धा सावंत, श्रीमती वंदना पवार, उपशहरप्रमुख सौ माधुरी चव्हाण, मुमताज भाटकर, सायरा खान व कार्यकर्ते उपस्थित होते

## सरफळेवाडी येथे कृषी सल्ला केंद्राचे शानदार उद्घाटन

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

सरफळेवाडी (ता. रोहा ) येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ अंतर्गत रत्नाई कृषी विद्यालय अकलूज येथील कृषीदूत सिद्धेश बाळाराम सरफळे यांच्या वतीने सरफळे वाडी येथे आयोजित कृषी सल्ला केंद्राचे शानदार उदघाटन सरफळेवाडी येथील चंद्रकांत पवार यांच्या हस्ते संपन्न करण्यात आले. यावेळी बाळाराम सरफळे, एकनाथ पार्टे, अविनाश येरुणकर, इंद्रजित घाडगे, राघो सरफळे, ऋषिकेश सरफळे, महेश सरफळे, व इतर शेतकरी बांधव उपस्थित होते

ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत शेतकऱ्यांसाठी जागरूकता केंद्र सुरु केले असून त्या माध्यमातून गावातील शेतकऱ्यांना वेळोवेळी उपयुक्त माहिती व मार्गदर्शन मिळणार असल्याची माहिती कृषीदूत सिद्धेश सरफळे यांनी यावेळी दिली आहे. अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विजयसिंह मोहिते पाटील, रत्नाई कृषी महाविद्यालयाचे समन्वयक डॉ.डी. पी. कोरटकर,प्राचार्य आर. जी.नलवडे, प्रा. एस. ए. एकतपुरे, प्रा. एस आर आडत,प्रा. डी. एस. मेटकरी,यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी दूत सिद्धेश सरफळे यांनी शेतकऱ्यांना कृषी विषयक सल्ला व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या प्रसंगी सिद्धेश सरफळे यांनी शेतकऱ्यांना येणाऱ्या अडीअडचणी समजावून घेऊन आंबा व काजू फळ बाग व्यवस्थापन, त्यावर येणारे इतर रोग व किडी याबाबत घ्यावायची काळजी, त्याबाबत ची उपाय योजना,खत व औषधं व्यवस्थापन, साठवणूक व निर्यात व्यवस्थापन व फायदे तोटे इ. बाबत सुयोग्य असे मार्गदर्शन केले.

## बॅगेतील रोख रक्कम लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घरी बॅगेत ठेवलेली रोख रक्कम कोणीतरी अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना शहरात घडली आहे. विशाल श्रीवास्तव यांनी राम भोईर अपार्टमेंट मार्केट यार्ड या ठिकाणी त्यांच्या राहत्या घरी बॅगेत ठेवलेले ३७ हजार रुपये कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली आहे.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी १) मयत लक्ष्मीबाई लक्ष्मण काळे उर्फ पुर्वाश्रमीची लक्ष्मीबाई दयाराम साखरे तर्फे वारस १/१) श्री.दिनेश लक्ष्मण काळे, वय : ७० वर्षे, धंदा : सेवानिवृत्त, रा.बी/९, सद्‌गुरु सोसायटी, टिळक रोड, कोप्री, कोप्री पोलीस स्टेश जवळ, ता.जि..ठाणे ४००६०३, १/२) श्री.शशिकांत लक्ष्मण काळे, वय : ६३ वर्षे, धंदा : सेवानिवृत्त, राहणार : एफ १/४०६, गोविंद धाम, फेज-२ सोसायटी, सह्याद्री सोसायटी समोर, मुंबई-पुणे रोड, कळवा, ता.जि.ठाणे ४००६०५, १/३) श्री.सुरेंद्र लक्ष्मण काळे, वय : ६१ वर्षे, धंदा : सेवानिवृत्त, राहणार : ए/१९/०३, सुर्योदय सोसायटी, नवरत्न हॉटेल समोर, सेक्टर ४८, नेरुळ, सीवूड, नवी मुंबई ४००६१५, १/४) श्रीमती.सुप्रिया सुरेश गंगाधरे, वय : ६८ वर्षे, धंदा : गृहिणी, राहणर : ३/३०२, मिलेनियम पार्क, बिल्डींग नं.३, हरी ओम नगर, मुलुंड ईस्ट, मुंबई ४०००८१, १/५) श्रीमती.शुभांगी जयवंत तुपे, वय : ६५ वर्षे, धंदा : गृहिणी, राहणार : शासकीय निवास, रुम नं.१, कमलाकर कॉम्प्लेक्स, भिवंडी वाडा रोड, मु.पो.शेलार, ठाणे-४२१३०२, २) मयत सुमती उर्फ जनाबाई मुरलीधर शेट्ये उर्फ पुर्वाश्रमीची सुमती उर्फ जनाबाई दयाराम साखरे तर्फे वारस २/१) श्र.प्रकाश मुलीधर शेट्ये, वय : ५९ वर्षे, धंदा : नोकरी, राहणार : एच-३२/१, ऑर्डीनंन्स ईस्टेट, अंबरनाथ, पश्चिम, ता.अंबरनाथ, जि.ठाणे, ठाणे-४२१५०२, २/२) श्री.सुनील मुरलीधर शेट्ये, वय : ५५ वर्षे, धंदा : नोकरी, राहणार : जय गणेश को.ऑप.हौ. सो., रुम नं.२०१, प्लॉट नं.३९०/ए लोकमान्य नगर, बस डेपोच्या मागे, पनवेल, जि.रायगड ४१०२०६, २/३) श्रीमती.सुजाता प्रकाश वनगे, वय : ५० वर्षे, धंदा : गृहिणी, राहणार : श्री अपार्टमेंट, ए-१४, शिवसेना ऑफिसच्या मागे, खोपट, ठाणे (वेस्ट) ४००६०१, ३) श्रीमती.यमुनाबाई उर्फ सरस्वती गजानन तुपे उर्फ पुर्वाश्रमीची श्रीमती.यमुनाबाई उर्फ सरस्वती दयाराम साखरे वय : ८५ वर्षे, धंदा : काहीनाही, राहणार : निळकंठ अपार्टमेंट, डी-१०१, चेरपोली, खार्डी, ता.शहापूर, जि.ठाणे-४२१३०१ आणि ४) मयत पांडुरंग दयाराम साखरे यांच्या सामाईक मालकीची मौजे : ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे सविस्तर वर्णन केलेली जमीन मिळकत महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लिमिटेड यांनी ''नवी मुंबई'' प्रकल्पाकरिता संपादीत केल्या असून सदर मिळकतींचे संपादनाबाबत युनिट केस नं.४/२००० अन्वये ॲवॉर्ड जाहीर करण्यात आले आहे.

**संपादीत मिळकतींचे वर्णन**
**मौजे : ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | गाव/युनिट केस नं. | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | एकूण क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| १ | ओवळे-४/२००० | १७९+१८०+१८२ +१८४/५ | १-२१.० |

वर नमूद मिळकतीच्या संपादनापोटी वाटप करण्यात येणाऱ्या संपूर्ण भूखंडामधील १) मयत लक्ष्मीबाई लक्ष्मण काळे उर्फ पुर्वाश्रमीची लक्ष्मीबाई दयाराम साखरे, तर्फे वारस १/१) श्री.दिनेश लक्ष्मण काळे, वगैरे ५, २) मयत सुमती उर्फ जनाबाई मुरलीधर शेट्ये उर्फ पुर्वाश्रमीची सुमती उर्फ जनाबाई दयाराम साखरे तर्फे वारस २/१) श्री.प्रकाश मुरलीधर शेट्ये, वगैरे आणि ३) श्रीमती.यमुनाबाई उर्फ सरस्वती गजानन तुपे उर्फ पुर्वाश्रमीची श्रीमती.यमुनाबाई उर्फ सरस्वती दयाराम साखरे यांच्या ३/४ हिश्श्यास येणारा भूखंड आमच्या अशिलांनी सदर भूखंडाचे मालक १) मयत लक्ष्मीबाई लक्ष्मण काळे उर्फ पुर्वाश्रमीची लक्ष्मीबाई दयाराम साखरे तर्फे वारस १/१) श्री.दिनेश लक्ष्मण काळे, वगैरे ५, २) मयत सुमती उर्फ जनाबाई मुरलीधर शेट्ये उर्फ पुर्वाश्रमीची सुमती उर्फ जनाबाई दयाराम साखरे तर्फे वारस २/१) श्री.प्रकाश मुरलीधर शेट्ये, वगैरे आणि ३) श्रीमती.यमुनाबाई उर्फ सरस्वती गजानन तुपे उर्फ पुर्वाश्रमीची यमुनाबाई उर्फ सरस्वती दयाराम साखरे यांच्याकडून सदर भूखंडामधील त्यांचे भाडेपट्ट्याचे हक्क कायमस्वरुपी हस्तांतरण करून घेण्याचे ठरविले आहे. त्याअर्थी भूखंडामध्ये अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर भूखंडावरील १) मयत लक्ष्मीबाई लक्ष्मण काळे उर्फ पुर्वाश्रमीची लक्ष्मीबाई दयाराम साखरे तर्फे वारस १/१) श्री.दिनेश लक्ष्मण काळे, वगैरे ५, २) मयत सुमती उर्फ जनाबाई मुरलीधर शेट्ये उर्फ पुर्वाश्रमीची सुमती उर्फ जनाबाई दयाराम साखरे तर्फे वारस २/१) श्री.प्रकाश मुरलीधर शेट्ये, वगैरे आणि ३) श्रीमती.यमुनाबाई उर्फ सरस्वती गजानन तुपे उर्फ पुर्वाश्रमीची यमुनाबाई उर्फ सरस्वती दयाराम साखरे यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत, हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि.०१/०८/२०२१

**सही/-**
**श्री.विशाल अनंत मुंडकर**
**ॲडव्होकेट**
**शॉप नं.२, पवन को.ऑप.हौ.सोसा.लि.,**
**कै.रत्नाकर खरे मार्ग, नवीन सेशन कोर्टा समोर, पनवेल-४१०२०६, जि.रायगड**
**मोबाईल नं.९८७०७३९००३**

## श्रमदानातून केलेला रस्ता अतिवृष्टी पावसामुळे गेला वाहून



**दै.रायगड नगरी । कर्जत**

स्वातंत्र्या पुर्वीपासून आदिवासीवाड्या ह्या रस्तापासून वंचित आहेत. गेली दहा ते पंधरा वर्षापासून येथील आदिवासी बांधव श्रमध्दानकरून तयार केलेला रस्ता दि. २२ जूलै रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे आदिवासी बांधवांनी श्रमध्दानूत तयार केलेला रस्ता पावसामुळे पूर्ण पणे वाहून गेलेला आहे. व नाल्यावर आदिवासी लोकांनी लाकडापासून तयार केलेले साकव सुध्दा पावसामुळे पूर्णपणे वाहून गेलेला आहे.

येथील आदिवासी लोकांची दळणवळणाची साधने पूर्णपणे बंद झालेली आहेत. येथील आदिवासी वाडीतील एखादा व्यक्ति आजारी पडल्यास हा रूग्ण व गरोदर स्त्रिया यांना दवखाण्यामध्ये अणण्यासाठी बांबूची डोळी करून रात्री अपरात्री ५ ते ६ किलोमीटर अंतरावर जूम्मापट्टी या ठिकाणी आणून नेरळ किंवा कर्जत या शहरा ठिकाणी उपचारासाठी अनावे लागते. तेव्हा या आदिवासी बांधवांनी अनेक संकटाला सामोरे जावे लागते.येथे राहाणाऱ्या आदिवासी बांधवांनी माननीय जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा योगिताताई पारधी अलिबाग रायगड यांच्याकडे विनंती मगणी केली यावेळी जैतू पारधी, गणेश पारधी, रमेश सांबरी, पांडू सांबरी, बाळू सांबरी, चंद्रकांत सांबरी, मनोज शिंगाडे विनंती मगणी निवेदन दिले.

तरी मागणीची पुरत्ता नसल्यास येथे सर्व आदिवासी बांधवांनी भारतात स्वतंत्रा दिनी १५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता जूम्मापट्टी येथे रस्ता रोखो आंदोलन करणार आहेत.

सिडको
शहरांचे शिल्पकार

### जाहीर सूचना
### (हक्कसोड पत्राबाबत)

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे उलवे, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील नमूद केलेली जमीन मूळ भूधारक धाया माया पाटील यांचे कडून नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली आहे. भूसंपादन कायद्यानुसार सदर जमिनीची देय होणारी नुकसान भरपाई वरील भूधारकांनी स्वीकारली असून खालील संपादित जमिनीचा ताबा देखील त्यांनीच दिला आहे.

| संचिका क्र. /नोड | मौजे / निवाडा क्र. | संपादित सर्व्हे क्र. / हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र (हे. आर) | इरादित भूखंडाचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ. मी.) |
| संचिका क्र. ९३/उलवे | उलवे ५२A | ८०/१ | ०-१२-६ | उलवे | २० | ६२ | १०० |

शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार साडेबारा टक्के योजने अंतर्गत **भूधारक चिंतामण गंगाराम पाटील** यांना **उलवे नोड** येथे **भूखंड क्र.६२, सेक्टर-२०, क्षेत्र-१०० चौ.मी**. भूखंडाचे इरादापत्र देण्यात आले आहे.

सदर भूखंड वाटपास पात्र असलेल्या भूधारक **कै. सखुबाई गंगाराम पाटील (मयत) यांचे वारस १. श्री. नरहरी गंगाराम पाटील २. सारंग गंगाराम पाटील व कै. सुशिला नारायण म्हात्रे (मयत) यांचे वारस ३. वसंत नारायण म्हात्रे ४. सुभाष नारायण म्हात्रे ५. शनिदास नारायण म्हात्रे ६. गजानन नारायण म्हात्रे ७. समाधान नारायण म्हात्रे ८. उषा गंगाराम पाटील उर्फ प्रतिभा दिलीप चौधरी** यांनी सह दुय्यम निबंधक यांच्या कडे हक्कसोड पत्र नोंदणीकृत करून प्रस्तावित भूखंडाचे लाभ चिंतामण गंगाराम पाटील यांच्या लाभात हस्तांतरीत केले आहे. सदर हक्कसोडचे महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग दोन, गुरूवार, मे २९, २०१४/ज्येष्ठ ८, शके १९३६, असाधारण क्रमांक २९, प्राधिकृत प्रकाशन, महाराष्ट्र रिजनल टाऊन प्लॅनिंग ॲक्ट - १९६६, नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारणा) विनियम, २००८ मधील विनियम १० नंतर समाविष्ट करावयाच्या '**१०अ**' मधील **मूद्दा क्र. ii** अन्वये संबंधीत हक्कसोडपत्रामध्ये भूखंड क्र., सेक्टर क्र., व क्षेत्राचा उल्लेख असणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे हक्कसोडपत्रामध्ये इरादित **भूखंड क्र.६२, सेक्टर-२०, क्षेत्र-१०० चौ.मी**. भूखंडाचा तपशील नमूद केला आहे. तसेच मौजे गव्हाण, निवाडा क्र.५०-, सं.नं/हि.नं-८०/१, क्षेत्र-०-१२-६ हे.आर या संपादित जमिनीचा उल्लेख केला आहे.

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तिंची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिचे नाव |
|---|---|
| **सखुबाई गंगाराम पाटील(मयत) यांचे वारस**<br>१. श्री. नरहरी गंगाराम पाटील<br>२. सारंग गंगाराम पाटील<br>**कै. सुशिला नारायण म्हात्रे(मयत) यांचे वारस**<br>३. वसंत नारायण म्हात्रे<br>४. सुभाष नारायण म्हात्रे<br>५. शनिदास नारायण म्हात्रे<br>६. गजानन नारायण म्हात्रे<br>७. समाधान नारायण म्हात्रे<br>८. उषा गंगाराम पाटील उर्फ प्रतिभा दिलीप चौधरी | चिंतामण गंगाराम पाटील |

उपरोक्त नोंदणीकृत हक्कसोडनुसार सिडकोकडून केवळ खालील व्यक्तीच उपरोक्त भूखंडाचे वाटप स्वीकारून करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरू शकतात.

| हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिचे नाव |
|---|
| चिंतामण गंगाराम पाटील |

वरील इरादित केलेल्या भूखंडा संदर्भात वर नमूद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार सोडले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे साडे बारा टक्के योजने संदर्भातील लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत /तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत /तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायलयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करून सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतीसह **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, ७ वा मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई** यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमूद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबददल कोणाचीही हरकत नाही असे समजुन वरील इरादित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर जाहीर सूचना ही संबंधीत गावाचे ग्रामपंचायत, तहसील कार्यालय तसेच सिडको व सिडकोला योग्य वाटेल अशा ठिकाणी प्रसिद्ध करण्यात येईल.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/१६१/२०२१-२२

# संक्षिप्त...

## वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचून दोघेजण पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचून मोटार सायकलवरुन आलेले दोघेजण पसार झाल्याची घटना शहरातील शिवाजी चौक परिसरात घडली आहे.

श्रीमती.सुशिला तेलंगे (६९) या मिडल क्लास सोसायटीतील वास्तू संकल्प या बंगल्यासमोरुन गांधी हॉस्पिटलकडे जाणाऱ्या रस्त्यावर पायी जात असताना मोटार सायकलवरुन आलेल्या दोन अनोळखी इसमांपैकी एकाने त्यांच्या गळ्यातील ७० हजार रुपये किंमतीची सोन्याची साखळी खेचून ते पसार झाले आहेत. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## बांधकाम साईटवरुन साहित्याची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बिल्डींग बांधकामाच्या साईटवरुन साहित्याची चोरी झाल्याची घटना करंजाडे वसाहतीमध्ये घडली आहे.

रघुलाल नागजी पटेल (५६) यांचे प्लॉट नं.१७, सेक्टर ५ ए, करंजाडे येथे बांधकाम सुरू असून त्या ठिकाणी बांधकामासाठी लागणारे लोखंडी सेंट्रींग, लोखंडी चॅनल, लोखंडी जॅक पोल व इतर साहित्य असा मिळून जवळपास १६ हजार ६०० रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेल्याची घटना घडली असून याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## प्रतिबंधीत तंबाखुजन्य अन्न पदार्थ साठा जवळ बाळगून विक्री केल्याप्रकरणी चौघांना घेतले ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

प्रतिबंधीत तंबाखुजन्य अन्न पदार्थाचा साठा जवळ बाळगून विक्री करीत असल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी चौघा जणांना ताब्यात घेवून त्यांच्याकडून १२ लाख २९५ रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

अन्न सुरक्षा अधिकारी रावसाहेब समुद्रे यांच्या फिर्यादीनुसार पनवेल परिसरात काही जण बेकायदेशीररित्या प्रतिबाधीत अन्न पदार्थाचा साठा करून विक्री करीत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार वपोनि अजयकुमार लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि.संजय जोशी, सपोनि अनिल देवळे, शिवाजी हुलगे आदींच्या पथकाने या प्रकरणी अनंत अहिरे (२५), सुमित दलाल (२६), उदय घाग (३०), रामकृष्ण निशाद (५३) या चौघांच्या दुकानावर छापा टाकून त्यांच्याकडून मुद्देमाल हस्तगत केला आहे व त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.

# माणगांव पोलीसांचे पूरआपत्तीतही पहिल्या दिवसापासून प्रशंसनिय काम

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

महाड शहर व तालुक्यातील आजुबाजुच्या संपूर्ण परिसरातील गावांना महापूराने वेढले दरडी कोसळल्या प्रचंड नुकसान झाले हे आता सर्वश्रुत आहे. पण पूराचे पहिल्यादिवशी पासूनच या परिसराचा जनसंपर्क तुटला व दळणवळण व्यवस्थेवर प्रचंडमोठा परिणाम झाला होता. सर्व यंत्रणा ठप्प पडली होती अशा वेळी फक्त पोलीसांची वायरलेस यंत्रणा कामी येत होती. मदतकार्य कसे करणार हा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. अशावेळी पालकमंत्री आदिती तटकरे पोलीस व जिल्हा प्रशासन व महाडचे आमदार भरतशेठ गोगावले आमदार अनिकेत तटकरे या सर्वांनी मिळून याठिकाणी जाणारे अडथळे दूर करण्यासाठी प्रयत्न केल्याने राष्ट्रीय आपत्ती निवारण पथकाच्या पहिल्या तुकडीला त्याठिकाणी पोहचता आले.

तसेच पोलीसांनी परिस्थितीचे भान राखत पोलीस अधिक्षक अशोक दूधे व अतिरिक्त पो-लीस अधिक्षक सचिन गुंजाळ यांच्या मार्गदर्शनात




माणगांवचे पोलीस निरिक्षक अश्वनाथ खेडकर यांच्या संकल्पनेतून आणि त्यांच्या सर्व सहकारी कर्मचारी यांनी माणगांव येथे तात्पूरते पोलीस मदत केंद्र स्थापण करुन पूरपिडीतांना तात्काळ जसे जसे शक्य होईल तसे व सर्व जनतेला आवाहन करीत अत्यावश्यक मदत पोहचविण्याचे काम सुरु केले. या दरम्यान ट्राफिक कंट्रोल व येणारे अति विशेष महत्वाचे व्यक्तींसाठी बंदोबस्ताचा ताणही या पोलीस यंत्रणेवरच होता. तसेच पिडीत पूरग्रस्त परिस्थिती मुळे निर्माण झालेली लोकांची त्रस्त चिडचिड मानसिकता या सर्व गोष्टींचा संयमाने व मोठ्या धिराने सामना करीत परिस्थितीवर नियंत्रण ठेवले आहे. आता हळूहळू सर्व परिस्थिती नियंत्रणात येत आहे, हे चांगले संकेत असुन माणगांव मध्ये पूरग्रस्तांना अत्यावश्यक गरजेपोटी तात्पूरते निर्माण केलेले मदतकेंद्र आता बंद केले असले तरी शासन मदत करीतच आहे.

परंतु पूरपिडीतभागात अनेक घरांचे नुकसान झाले आहे. ही घरे पुन्हा उभी करण्यासाठी या लोकांना लागणारे बांधकाम साहित्य आणि इतर गोष्टी पूरविण्यासाठी सुध्दा शासन स्तरावरुन व दानशूर सामाजिक संस्थाच्या पुढाकाराने जसे शक्य होईल तसे लवकरात लवकर या कामी आणखी प्रयत्न करुन या लोकांना मदत पोहचविली पाहीजे. जेणेकरुन प्रतिकुल परिस्थितीचा सामना करणे सोपे होईल. तसेच लोकांनी या ठिकाणी मदतीसाठी पोहचताना स्वयंस्फूर्तपणे कुठेही गडबड गोंधळ व ट्राफिकला अडचण होईल असे वर्तन करु नये. संयमाने व नियमांचे सूचनांचे पालन करीत पोलीसांना सहकार्य करावे अशा प्रकारच्या भावना वरिष्ठ पोलीस निरिक्षक अश्वनाथ खेडकर यांना वार्ताहरांनी त्यांचेशी संपर्क करुन मदतकेंद्र विषयी बोलताना व्यक्त केल्या आहेत.

## महिलेच्या हातातून रोख रक्कम चोरणाऱ्या चोराला २४ तासांच्या आत जेरबंद

**दै.रायगड नगरी । कर्जत**

नेरळ येथील बँकेतून पैसे काढून घरी निघालेल्या वृद्ध महिलेच्या हातातून लाख रुपयांची रोकड ठेवलेली पिशवी चोरुन पळालेल्या चोराला २४ तासांच्या आत जेरबंद करण्यात नेरळ पोलिसांना यश आले आहे.

नेरळ टेपआळी येथे राहणाऱ्या सुनंदा मधुकर कोकाटे (वय ६५) या नेरळ येथील बँकेतून १ लाख ९ हजार रुपयांची रोकड घेऊन घरी जाण्यासाठी बाहेर पडल्या होत्या. दुपारची वेळ असल्याने त्यांनी गजबजलेल्या बाज-ारपेठ रस्त्याने जाण्यापेक्षा जवळचा रस्ता असलेल्या नेरळ माथेरान रेल्वे रुळ मार्गाने जाणे पसंत केले.



मात्र त्यांच्या मागून एक चोरटा त्यांचा पाठलाग करत होता. संधी साधून त्याने त्या वृद्ध महिलेला धक्का देत त्यांच्या हातातून पैसे असलेली पिशवी चोरुन पोबारा केला होता. खाली पडल्याने कोकाटे यांना दुखापतही झाली. मात्र तशा परिस्थितीत त्यांनी नेरळ पोलीस ठाणे गाठत फिर्याद दाखल केली होती.

तक्रार दाखल झाल्यावर पोलीस अधीक्षक अशोक दुधे, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन गुंजाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल घेरडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली नेरळ पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय बांगर यांनी दोन तपास पथके तयार केली. पहिल्या पथकात महिला पोलीस उपनिरीक्षक प्रीती आढावे, पोलीस नाईक संदीप चव्हाण, भाऊ आघाण, समीर भोईर, तर दुसर्या पथकात पोलीस उपनिरीक्षक गिरीश भालचीम, सहाय्यक फौजदार गणेश गिरी, पोलीस नाईक शरद फरांदे, अविनाश वाघमारे, होमगार्ड राहुल पाटील यांचा यात समावेश होता.


या पथकांनी तात्काळ तपासाला लागण्याचे आदेश बांगर यांनी दिले. त्यानुसार या पथकांनी घटनास्थळापासून तपासाला सुरुवात केली. गोपनीय माहिती, तांत्रिक पुरावे यावरून पोलिसांनी त्या चोराला निष्णातपणे हेरले आणि त्याच्या मुसक्या आवळल्या. कृष्णा बाबू तुपे असे त्याचे नाव असून तो देवपाडा येथे राहणारा आहे. नेरळजवळील देवपाडा येथून २४ तासाच्या आत पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले तसेच चोरीचे एक लाख नऊ हजार रुपये देखील त्याच्याकडून हस्तगत करण्यात नेरळ पोलिसांना यश आले आहे.

## तळा तालुक्यात गुरांना त्वचा रोगाची लागण ; शासनाने लसीकरणाचा वेग वाढविणे गरजेचे

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यात गुरांना त्वचा रोगाची लागण झाली असल्याने गुरे मालकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. तळा तालुक्यात उत्पन्नाचे दुसरे कोणतेही साधन नसल्याने शेती हा येथील नागरिकांचा मुख्य व्यवसाय आहे. सध्या शेतीची कामे सुरू असल्याने शेतात नांगरणीसाठी गुरांची आवश्यकता असते. परंतु तालुक्यात शेकडो गुरांना त्वचारोगाची लागण होत असल्याने या गुरांच्या लसीकरणाचा वेग वाढविणे गरजेचे असल्याचे मत शेतकरी बांधवांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

तालूक्यात सालशेत, तळेगाव, कासेवाडी, मेढे अशा गावातुन त्या गुरपालक व ग्रामस्थांनी केलेल्या मागणी नुसार या भागात जवळपास ६०० हुन अधिक गुरांचे लसीकरण करण्यात आले आहे. रोगांची लागणलक्षात घेता या लसीकरणाचा वेग वाढविण्यासाठी शासनाने लक्ष देण्याची गरज आहे.या रोगाची लक्षणे म्हणजे अंगावर फोडी येणे, खाज येणे, पावसाळ्याचे दिवस असल्याने पाण्यामुळे या जखमा वाढण्याची शक्यता आहे. यासाठी वेळेवर लसीकरण मोहीम हाती घेणे गरजेचे आहे. असे शेतकरी बांधवांकडुन सागंण्यात येत आहे. एकतर जनावरांची संख्या दिवसें दिवस कमी होत असून त्यामध्ये गुरांच्या किमतीही दिवसें दिवस वाढत चालल्या आहेत. अशातच जनावरांना होत असलेल्या त्वचा रोगामुळे शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण पसरले आहे.



# शेतकरी कामगार पक्ष पनवेल, उरण यांच्या वतीने एक हात मदतीचा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रत्नागिरी जिल्ह्यातल्या चिपळूणची परिस्थिती खूपच बिकट बनली होती. मुसळ-धार पावसानं चिपळूणच्या वाशिष्ठी नदीला पूर येऊन नदीचं पाणी शहरात शिरलं होत.संपूर्ण शहराला पाण्याचा वेढा पडल्यानं चिपळुणात मदत पोहोचणंही अशक्य बनलं होत. चिपळुण कोकणात तातडीनं मदत पाठवण्याची तय्यारी कोकण शिक्षक आमदार बाळाराम पाटील यांनी कार्यकर्ते पदाधिकारी यांना केली होती. त्यामुळे आज कोकणात सामानाने भरलेले गाड्या घेऊन चिपळूण, पोलादपूर, महाड, माणगांव याठिकाणी पूरग्रस्तांच्या घरोघरी जाऊन सामानाचे किती वाटप करण्यात आले.



यावेळी पनवेल महानगरपालिका नगरसेवक रविंद्र अनंत भगत, राजेश केणी, देवा पाटील, कमलाकर जले, प्रल्हाद चौधरी, चंद्रकांत पाटील, अजित जाधव, संदीप पाटील सहकारी मित्र मंडळी सहभागी झाले होते.


# नागोठणे शहर व विभागात विजवितरणने मांडलाय खेळ

### वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त

**दै.रायगड नगरी । वाकण**

नागोठणे शहर व ग्रामीण विभागात महावितरणने सध्या खेळ मांडला असून दर अर्ध्या, एक तासाच्या अंतराने तर कधी कधी पाच-पाच मिनिटांनी वीज पुरवठा खंडित होत आहे. याचा नाहक त्रास नागरिकांना सोसावा लागत आहे. विजेच्या लपंडावाने नागरिक त्रस्त, तर महावितरण मस्त असे चित्र शहरात पहायला मिळत आहे. वीज खंडित होण्याची कोणतीच ठराविक वेळ नसून रात्री बेरात्री, तर दिवसा कधीही अर्ध्या, एका तासाच्या अंतराने वीज खंडित होत आहे. कधी पाच मिनिटे तर कधी अर्धा किंवा एक-एक दोन-दोन तास वीजपुरवठा खंडित होत आहे.

महावितरणच्या या गलथान कारभाराने जणू काही शहरात अघोषित लोडशेडिंग करण्यात येत असल्याचा प्रत्ययच नागरिकांना येत आहे. वीज खंडित का झाली याची माहिती घेण्यासाठी कार्यालयाशी संपर्क केल्यास वीज खंडित झाल्याबरोबर कार्यालयातील 'फोन' अनेकदा बंद असल्याचा अनुभव ग्राहकांना येत आहे. त्यामुळे नागरिक चांगलेच वैतागले आहेत. तर अधिका-यांच्या भ्रमणध्वनीवर संपर्क केला असता



नेहमीच कुठे ना कुठे तरी तांत्रिक बिघाड झाल्याचा सूर त्यांच्याकडून ऐकण्यास मिळत आहे.

मागील काही दिवसांपासून तर नागोठणे शहरात विद्युत पुरवठा खंडित होणे, विद्युत दाब अचानक कमी जास्त होणे यासारखे प्रकार नेहमीचेच झाले आहेत. अलिकडच्या काही दिवसापासून नेहमी वीजपुरवठा खंडित होत असतो. चुकून एखादे वेळी वीजपुरवठा सुरू झाला तर तो पुन्हा कधी खंडित होईल याचा अंदाजही नसतो. अचानक विद्युत पुरवठा खंडित होत असल्याने व विद्युत दाब अचानक कमी-जास्त होत असल्याने विजेवर चालणाऱ्या उपकरणात बिघाड होत आहेत.

नागपठण्यात वेळी अवेळी वीजपुरवठा खंडित होत असल्यामुळे याचा विपरित परिणाम विजेवर चालणाऱ्या उपकरणावर होत आहे. यामुळे अनेकांच्या टीव्ही, फ्रिज, कुलर, पंखा, झेराक्स मशीन, कॉम्प्युटरमध्ये बिघाड होत आहेत. त्यामुळेही नागरिकांना नाहक आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. त्यामुळेच वीज देयकांच्या वसुलीसाठी वीज ग्राहकांच्या मागे तगादा लावणाऱ्या व एक देऊळ जरी दिले तरी संबंधित वीज ग्राहकाचा वीजपुरवठा बंद करण्याची कारवाई करणाऱ्यास आपल्या कर्मचाऱ्यांना भाग पाडणा-या महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

दरम्यान वीज बील भरायला थोडा जरी उशीर झाल्यास वीज वितरण कंपनीचे वायरमन लगेचच वीज कनेक्शन तोडण्याची धमकी देतात. मग, वीज गायब झाल्यानंतर कंपनीचे अधिकारी व कर्मचारी तोंडे का लपवतात, असा सवाल करीत नागरिक वीज वितरणाच्या सध्या सुरु असलेल्या विजेच्या लपंडावाबद्दल तीव्र संताप व्यक्त करीत आहेत.

## मराठी माध्यमातून शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्थांना वसाहत शुल्कांमध्ये सिडकोची ५० टक्के सवलत

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

मराठी माध्यमातून शिक्षण देणाऱ्या नवी मुंबई आणि सिडकोच्या नवीन शहर प्रकल्पांतील शिक्षण संस्थांना विविध प्रकारच्या वसाहत शुल्कांमध्ये ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय सिडको महामंडळाने घेतला आहे. महाराष्ट्राची राजभाषा असलेल्या मराठीचा प्रसार आणि संवर्धन करण्यामध्ये मराठी शाळा महत्त्वाची भूमिका पार पाडत असल्याने त्यांच्या या कार्याला प्रोत्साहन म्हणून सदर निर्णय घेण्यात आला आहे.

महाराष्ट्राची राजभाषा असलेल्या मराठीला प्रोत्साहन देण्याच्या सरकारच्या धोरणानुसार नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या निर्देशांनुसार सिडकोच्या संचालक मंडळाच्या शनिवारी झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

सिडको महामंडळ हे नवी मुंबई क्षेत्रासाठी आणि सिडकोने विकसित केलेल्या नवीन औरंगाबाद, वाळूज महानगर, नवीन नाशिक, नवीन नांदेड यांसारख्या शहरांकरिता 'नवीन नगर विकास प्राधिकरण' म्हणून कार्यारत आहे. शहराचा सर्वंकष विकास करण्याच्या दृष्टीने सिडकोकडून विकास प्रकल्पांप्रमाणेच सामाजिक उद्देशाकरिताही भूखंडांचे वाटप करण्यात येते. यानुसार पूर्व प्राथिमक शाळांपासून ते पदवी आणि व्यावसायिक महाविद्यालये उभारण्याकरिता सिडकोकडून नवी मुंबई आणि नवीन शहरांमध्ये सामाजिक भूखंडांचे वाटप करण्यात आले आहे. नवी मुंबईमध्ये एकूण ११७ भूखंडांचे वाटप सिडकोकडून शिक्षण संस्थांना करण्यात आले आहे. नवी मुंबईकरिता 'नवी मुंबई जमिनी विनियोग अधिनियम २००८ आणि नवीन शहरांकरिता १९८२ च्या जमिनी विनियोग अधिनियमानुसार भाडेपट्टा कराराने भूखंडांचे वाटप करण्यात येते. भाडेपट्टा कालावधीच्या काळात या संस्थांकडून शिल्लक भाडेपट्टा आकार, विलंब माफी शुल्क, मुदतवाढीसाठी अतिरिक्त अधिमूल्य, अतिरिक्त चटई क्षेत्र मंजूर करण्याकरिता अतिरिक्त अधिमूल्य इ. वसाहत शुल्के आकारण्यात येतात.

महाराष्ट्राची राजभाषा असलेल्या मराठीच्या प्रसार आणि संवर्धनाकरिता राज्य शासनाकडून विविध उपक्रम व योजना राबविण्यात येत आ-हेत. परंतु, बऱ्याचदा मराठी माध्यमाच्या शाळांना आर्थिक पेचप्रसंगांचा सामना करावा लागतो. माफक शैक्षणिक शुल्क आकारणाऱ्या या शाळांचे उत्पन्नाचे आर्थिक स्रोतही मर्यादित असतात. यामुळे इंग्रजी माध्यमाच्या खासगी शाळांच्या बरोबरीने विद्यार्थ्यांसाठी सोयीसुविधा पुरवणे या शाळांना आर्थिकदृष्ट्या कठीण होते. या बाबी लक्षात घेऊन नवी मुंबई आणि सिडकोच्या नवीन शहर प्रकल्पांतील मराठी माध्यमातून शिक्षण देणाऱ्या संस्थांना विविध प्रकारच्या वसाहत शुल्कांमध्ये ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय सिडकोकडून घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे कोविड-१९ व टाळेबंदीच्या काळात आर्थिक संकटाचा सामना कराव्या लागलेल्या मराठी माध्यमाच्या शाळांना मोठा दिलासा मिळणार आहे.

> भौतिक विकासाबरोबरच समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक विकासालाही तितकेच महत्त्व देण्याचे सिडकोचे धोरण आहे. या धोरणाला अनुसरूनच मराठीचा प्रसार व संवर्धनाकरिता महत्त्वाची भूमिका पार पाडणाऱ्या मराठी माध्यमाच्या शाळांना वसाहत शुल्कांमध्ये सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे या शाळांना विद्यार्थी विकासाच्या अन्य बाबींवर लक्ष केंद्रित करणे सुलभ होणार आहे.
>
> **डॉ. संजय मुखर्जी**
> **उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

## 'एक हात मदतीचा परिस्थिती सावरण्याचा' या उद्देशातून महाडकरांना मदत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

'एक हात मदतीचा परिस्थिती सावरण्याचा' या उद्देशातून पनवेल येथील वैभव देशमुख इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड अर्थात व्हीडीआयपीएलच्या वतीने महाड पूरग्रस्तांना ७०० चादर, ७०० ब्लँकेट आणि १४०० टॉवेल आदी साहित्याचे वाटप करण्यात आले.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत व ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली व्हीडीआयपीएलच्या वतीने शुक्रवारी पनवेल येथून महाड येथे मदत साहित्य रवाना झाले होते. या साहित्याचे वाटप पूरग्रस्तांना आमदार निरंजन डावखरे यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष महेश मोहिते, उपाध्यक्ष राजेश मपारा, भाजपचे तालुका चिटणीस जयवंत देशमुख, रमेश देशमुख, युवानेते अमित घाग, सोपान जांभेकर, यांच्यासह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते. या मदतीबद्दल वाय. टी. देशमुख व कटुंबियांचे महाडकरांनी आभार मानले.